पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई

● वर्ष १ ● अंक 63 ● बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ ● मूल्य 3 ● पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

आयुष्यात यशस्वी व्हायचं असेल तर स्वत:वर विश्वास ठेवायला शिका, कारण इतर लोक फक्त सल्ला देतात पण संघर्ष आपलाच असतो.

सिटी न्यूज सुपरफास्ट
तेल्हारा शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
कृष्णा विखे
शहर प्रतिनिधी
+91 7262838288

# धो-धो नव्हे, जीवघेणा पाऊस! गेल्या महिनाभरात अनेकांनी गमावला जीव

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

मुंबई : राज्यात सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी परिस्थिती गंभीर झाली असून, जुलै महिन्यात जवळपास १३७ जणांच्या मृत्यूची नोंद करण्यात आल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अहवालातून समोर आली आहे. विभागाने या संदर्भातील अहवाल मंगळवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर केल्याचे कळते. या मृत्यूंपैकी वीज पडून सर्वाधिक ५३ जणांचा जीव गेला, तर भिंती कोसळणे, झाडे पडणे, पुरात वाहून जाणे आणि दरडी कोसळणे या घटनांमुळेही मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली आहे.

राज्यात यंदाच्या मान्सूनमध्ये अनेक भागांत मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यातून निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीचा आढावा सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्या वेळी राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने सादर केलेल्या सविस्तर सादरीकरणात जुलै महिन्यातील दुर्घटनांची आकडेवारी.

२८ जुलै ते तीन ऑगस्ट या कालावधीतच राज्यात पावसाशी संबंधित विविध दुर्घटनांमध्ये २२ जणांचा मृत्यू झाला असून, सहा जण जखमी झाले आहेत. ठाणे जिल्ह्यात इमारत कोसळून दहा जणांचा मृत्यू झाल्याची घटना सर्वाधिक गंभीर ठरली. याशिवाय यवतमाळ, धुळे, बुलढाणा आणि सोलापूर जिल्ह्यांत पुराच्या पाण्यात वाहून जाण्याच्या घटनांमुळेही जीवितहानी झाली आहे.

**५०५ जनावरांचा मृत्यू**

वीज पडून ५३,भिंत पडून ३५, झाड पडून २१, पुरात वाहून २१, दरड कोसळून ७.एकूण १३७.

जुलै महिन्याच्या कालावधीत राज्यभरात ५०५ प्राण्यांचा मृत्यू झाला असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालानुसार या कालावधीत वीज पडून, गारपीट, झाड पडून, भिंत पडून आणि आग लागून या जनावरांच्या झालेल्या मृत्यूची नोंद करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## »थोडक्यात

### वैयक्ति वादातून बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतले!

पुणे : पुण्याच्या लोहगाव परिसरातून एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरातील वादाचा राग काढण्यासाठी एका महिलेनं चक्क नऊ महिन्यांच्या निरागस बाळाच्या तोंडात फेविक्विक टाकल्याचा भयंकर प्रकार घडला आहे. या अमानुष कृत्याप्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह तीन जणांवर गुन्हा नोंदवला आहे. सानिया शेख (रा. कलवड वस्ती, लोहगाव), रियाज इमाम हाल्याळ (मुंबई) आणि हाजी मलंग शेख (रा. कांदिवली, मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

### मुंबई पोलिस वेतन घोटाळा व्याप्ती वाढणार!

मुंबई : मुंबई पोलिस दलातील वेतन घोटाळा उघडकीस आल्यानंतर, या घोटाळ्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. केवळ २०१९ आणि २०२०मध्ये नव्हे, तर सेवार्थ प्रणाली सुरू होण्यापूर्वीही अशाप्रकारे फेरफार झाल्याचा संशय असल्याने कामकाजाचे ऑडिट सुरू झाले असून तपास गुन्हे शाखेकडे देण्यात आला. आरोपींनी याआधी ज्या ज्या कार्यालयांत कर्तव्य बजावले, त्या ठिकाणचा लेखाजोखा तपासला जात आहे. हे ऑडिट झाल्यावर घोटाळ्यातील रकमेचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. ज्या दहा व्यक्तींच्या नावाने वेतन काढले, त्या कोण, याचा तपास सुरू आहे.

---

### महिला प्रदेशाध्यक्षापदी वैशाली नागवडे नियुक्त

मुंबई : अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्या गच्छंतीनंतर रिकाम्या झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावर वैशाली नागवडे यांची वर्णी लागली आहे. मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या हस्ते नागवडे यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. अजित पवारांच्या अत्यंत विश्वासू कार्यकर्त्या म्हणून वैशाली नागवडे यांची ओळख आहे. त्यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादीच्या महिला आघाडीत नवे वळण आले आहे.

# कल्याणमध्ये हलगर्जीपणा; अडीच वर्षाच्या मुलाच्या कमरेत राहिली इंजेक्शनची सुई!

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

मुंबई: कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. भटक्या कुत्र्याने चावा घेतल्यानंतर अडीच वर्षांच्या चिमुकलीला रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यासाठी रुग्णालयात आणण्यात आले. मात्र तेथील कर्मचाऱ्यांनी निष्काळजीपणे इंजेक्शन देण्याची मर्यादा ओलांडली. लास तोचताना थेत सुई तुटून चिमुकल्याच्या कामरेच अडकली. केवळ, यानंतर किंवा संभाषणाचा गांभीर्याने विचार करण्याऐवजी डॉक्टरांनी जे केले, ते धक्कादायक होते.

## एक्स-रे पाहून आई-वडील हादरले



अकरा वर्षांचा कवेश पांडे किंवा चिमुकल्याला त्याची आई काजल पांडे हिने त्याला नाडी देण्यासाठी पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात आणले. ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांनी जल्लोष केला, पण त्याचवेळी सुई तुटल्याचा संशय आला. त्यांनी तातडीने तेथे उपस्थित डॉक्टर व कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. फक्त, असंवेदनशील कर्मचारी आणि डॉक्टरांनी सांगून काजलला 'सुई कुठे रिकामी आहे याची काळजी करू नका' असे म्हणत तिला चिमुकल्याला घरी नेण्यास सांगितले. घरी पोचल्यावर काही वेळातच मी असह्य वेदनांनी मात केली आणि सतत रडायला लागलो. स्कर्टची किंमत एवढी आहे हे पालखीतल्यांनाही कळले नाही. संशय आल्यानंतर त्यांनी तातडीने दुसऱ्या ठिकाणी एक्स-रे काढला. एक्स-रे रिपोर्ट पाहिल्यानंतर डॉक्टर आणि पालकांना मोठा धक्का बसला. चिमुकल्याच्या खोलीच्या आत सुईचा तुटलेला भाग तसाच अडकलेला दिसला.

# 76,200 कोटींच्या अर्थसंकल्पातून दोन टप्प्यांत उभारले जात आहे वाढवण बंदर: गौरव दयाल

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**मुंबई** . वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी एनएसआयटीसी ते अटल सेतूपर्यंत २,००० कोटींच्या अर्थसंकल्पातून दुसरा लिंक रोड बनवण्यासाठी डीपीआर तयार केला जात असल्याचे गौरव दयाल यांनी सांगितले. जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) हे सर्वाधिक व्यस्त बंदर असल्याने, आगामी काळात ७६,२०० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पातून दुसरे 'वाढवण बंदर' उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याबाबत माहिती देताना जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल यांनी सांगितले की, हे काम दोन टप्प्यांत पूर्ण केले जाईल. पहिल्या टप्प्यात २०२६ ते २०३० आणि दुसऱ्या टप्प्यात २०३० ते २०३३ पर्यंत हे बांधकाम पूर्ण केले जाईल. हे बंदर उभारल्यामुळे



माल चढवण्या-उतरवण्यात (लोडिंग-अनलोडिंग) लागणारा बराच वेळ वाचेल, ज्यामुळे आयात-निर्यात सुलभ होईल आणि मोठ्या प्रमाणावर निधीचीही बचत होईल. अध्यक्षांनी पुढे सांगितले की, गेल्या एका वर्षापासून बंदरावरील कार्यप्रणाली (ऑपरेशनल सिस्टीम) अद्ययावत करण्याच्या दिशेने डिजिटायझेशन केले जात आहे. याद्वारे डिजिटल ऑटोमेशन आणि ऑटोमोड सिस्टीमद्वारे शिप ऑपरेशन केले जाणार आहे. त्यांनी सांगितले की, भारताचा जगातील इतर देशांसोबतचा व्यापार वेगाने वाढत आहे. अशा स्थितीत बंदरावरून रस्ते मार्गाने वस्तूंची वाहतूक करताना वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी डीपी वर्ल्ड टर्मिनस एनएसआयटीसी बंदरापासून अटल सेतूपर्यंत दुसरा लिंक रोड तयार केला जात आहे. २००० कोटी रुपयांच्या बजेट असलेल्या या प्रकल्पाचा डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) तयार केला जात असून हे काम २०२८-२९ पर्यंत पूर्ण केले जाईल. जेएनपीए अध्यक्ष गौरव दयाल यांनी सांगितले की, आज या बंदरावरून अमेरिका, युरोपसह दोनशे देशांसोबत आयात-निर्यात केली जात आहे आणि येत्या काळात इतर देशांशीही आयात-निर्यातीच्या शक्यता शोधल्या जातील.

# अकोला सायबर पोलिसांची कारवाई!

## सायबर फसवणुकीतील ५ आरोपींना गोव्यातून अटक

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

अकोला: अकोला सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने आंतरराज्यीय सायबर गुन्हेगारांविरुद्ध मोठी कारवाई करत गोव्यातून ५ आरोपींना अटक केली आहे. पहिल्या प्रकरणात, अकोल्यातील एका टाईल्स व्यापाऱ्याला कमी भावात माल देण्याचे आमिष दाखवून ४,१९,००१ रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली होती. या गुन्ह्यात उत्तर गोव्यातून यशपाल वासुदेवभाई निमावत आणि सोनु भवरकुमार यादव या दोघांना २९ जुलै रोजी अटक करण्यात आली. दुसऱ्या घटनेत, अकोल्यातील एका महिला डॉक्टरला 'अल्गो ट्रेडिंग' मध्ये जास्त परताव्याचे आमिष दाखवून ४५,६६,७५० रुपयांचा गंडा घालण्यात आला होता. या



प्रकरणी देवेंद्र सुरेशचंद्र शर्मा, अंकुर सुरेश चावडा आणि हबीबुर रहमान फकरुद्दीन या तीन आरोपींना पिलर्ण (गोवा) येथून ३० जुलै रोजी ताब्यात घेण्यात आले. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ७ बँक खाती फ्रीज केली. आरोपींकडून २ लाख ५० हजार रुपये रोख, ३२ मोबाईल फोन, १ टॅब, १ मॉनिटर आणि ५ वाय-फाय राऊटरसह इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. अज्ञात व्यक्तींशी ऑनलाईन व्यवहार करताना नागरिकांनी सतर्क राहावे आणि फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# मुंबईवर दहशतवादी हल्ला होणार!

मुंबई : मुंबईवर दहशतवादी हल्ला होणार असल्याची सोशल मिडियावर पोस्ट शेअर करण्यात आली. त्यानंतर मुंबई पोलिसांकडून घटनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर ऑगस्ट २०२६ दरम्यान भारतासाठी धोक्याचा इशारा देणारी पोस्ट करण्यात आली. ही पोस्ट शेअर करण्यात आल्याने खळबळ उडाली. या पोस्टमध्ये ९ ते १८ ऑगस्ट हा अतिशय धोकादायक कालावधी असून पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून मोठ्या हल्ल्यांची शक्यता व्यक्त करण्यात आली. ही पोस्ट इंग्रजीत आहे. अनेकांनी ही पोस्ट रिशेअर देखील केली. तसेच पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. पोलिसांकडून या पोस्टची दखल घेण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# काम सुधारा अन्यथा खांदेपालट करावी लागेल- उपमुख्यमंत्री शिंदे

## संजय शिरसाट, संजय राठोडसह चार मंत्र्यांना निर्वाणीचा इशारा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याल पक्षातील काम न करणाऱ्या काही मंत्र्यांना फैलावर घेतल्याची माहिती समोर आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीपूर्वी शिवसेना पक्षाची स्वतंत्र प्री-कॅबिनेट बैठक पार पडली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या चार मंत्र्यांना सज्जड दम दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

या चार मंत्र्यांपैकी तीन जणांची नावे समोर आली आहेत. यामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, वने, मदत व पुनर्वसन तसेच मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा समावेश आहे. या मंत्र्यांनी आगामी काळात आपल्या कामगिरीत सुधारण न केल्यास त्यांचे मंत्रिपद काढून घेतले जाऊ शकते, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. या मंत्र्यांना वारंवार तंबी देऊनही त्यांच्या खात्याचा कारभार सुधारलेला नाही. याशिवाय, शिवसेना पक्षाच्या विस्तारासाठी या मंत्र्यांकडून अपेक्षित असलेले काम होताना दिसत नसल्याचे सांगितले जाते. परिणामी एकनाथ शिंदे या चार मंत्र्यांच्या कामावर खूश नसून त्यांनी संबंधितांना इशारा दिला आहे. दर तीन महिन्यांनी एकनाथ शिंदे यांना मंत्र्यांच्या कामगिरीचा एक रिपोर्ट दिला जातो. त्या अहवालात संबंधित मंत्र्यांच्या कामगिरीत सुधारणा दिसली नाही तर त्यांची मंत्रिपदावरुन उचलबांगडी होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. एकनाथ शिंदे यांनी एकप्रकारे या मंत्र्यांना पायउतार होण्यासाठी तयार राहा, अशी सूचनाच दिली आहे. त्यामुळे आता हे मंत्री आपली कामगिरी उंचावण्यासाठी काय करणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.




# इन्शुरन्स नसेल तर मिळणार नाही पेट्रोल!

## देशभरात खळबळ : सुप्रीम कोर्टाचा नवा नियम

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**दिल्ली** : आता सर्वसामान्यांची चिंता वाढवणारी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. देशभरात विनाविमा धावणाऱ्या वाहनांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. ज्या वाहनांचा विमा नसेल, त्यांना पेट्रोल पंपावर पेट्रोल किंवा डिझेल दिले जाणार नाही, असा थेट प्रस्ताव न्यायालयाने दिला आहे. ही मोहीम प्रथम पायलट प्रोजेक्ट म्हणून राबवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत.

विमा नसलेल्या सर्व गाड्यांवर आता ऑटोमॅटिक ई-चलान फाटणार आहे. डिजिटल ट्रॅकिंग आणि कॅमेऱ्यांच्या मदतीने अशा गाड्यांची त्वरित ओळख पटवून थेट कारवाई केली जाणार आहे. रस्ते अपघातात निष्पाप पीडितांना वेळेवर विम्याची भरपाई मिळावी,



या उद्देशाने हा निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे आता विमा नसलेल्या वाहनधारकांना थेट पेट्रोल पंपावरच ब्रेक लागणार असून, वाहनाचा विमा नूतनीकरण केल्याशिवाय इंधन मिळणे कठीण होणार आहे.

देशभरात तब्बल ५६ टक्के वाहने विना विमा रस्त्यावर धावत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले होते. यावर कोर्टाने अतिशय कठोर निर्णय घेतला. हायटेक तंत्रज्ञानाचा वापर करून ही कठोर यंत्रणा राबवण्याचे आदेश प्रशासनाला कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे आता इन्शुरन्स संपलेल्या गाडीचालकांना त्वरित नूतनीकरण करावे लागणार असून, अन्यथा थेट हजारो रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. त्याशिवाय पंपावर पेट्रोल आणि डिझेलही मिळणार नाही. सध्या पायलट प्रोजेक्ट कोर्टाने राबवायला सांगितला आहे. भविष्यात हा निर्णय संपूर्ण देशभरात लागू होऊ शकतो, असे सांगण्यात येत आहे.

### शिक्षा आणि दंडाचीही तरतूद

मोटार वाहन कायद्यान्वये, वैध थर्ड-पार्टी विम्याशिवाय वाहन चालवल्यास किंवा चालवण्यास कारणीभूत ठरल्यास कठोर शिक्षेची तरतूद आहे. पहिल्यांदा गुन्हा केल्यास ३ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा २,००० रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. दुसऱ्यांदा पकडल्यास ३ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा ४,००० रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

### १६.५ कोटी वाहनांना विमाच नाही

न्यायमूर्ती संजय करोल आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी झाली. भारतामध्ये धावणाऱ्या वाहनांपैकी तब्बल ५६ टक्के वाहने विमा नसलेली आहेत, यावर खंडपीठाने आश्चर्य व्यक्त केले. आकडेवारीनुसार, देशात ३०४ दशलक्ष नोंदणीकृत वाहने आहेत. त्यापैकी १६५ दशलक्ष वाहने विमा नसलेली आहेत. सरकारी आकडेवारीनुसार देशातील २२ टक्के रस्ते अपघातांमध्ये विमा नसलेल्या वाहनांचा समावेश असतो. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, मोटार वाहन कायद्याच्या कलम १४६ अंतर्गत अनिवार्य विम्याचा मूळ उद्देशच निष्फळ ठरत आहे. त्यामुळे अपघातग्रस्तांना नुकसान भरपाईसाठी दीर्घकाळ कायदेशीर लढा देण्यास भाग पाडले जात आहे.

# माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांची प्रकृती स्थिर; मेंदूवरील यशस्वी शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत सुधारणा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला** : राज्याचे माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू गुलाबराव गावंडे यांची प्रकृती सध्या स्थिर असून अमरावती येथे मेंदूवरील यशस्वी शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून वैद्यकीय तज्ज्ञांनी त्यांना संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे. पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी भाऊंच्या तब्येतीची चौकशी केली आहे. तर आमदार हरिश पिंपळे, आमदार नितीन देशमुख, खा.संजय देशमुख, आ.साजीद खान आदींनी प्रत्यक्ष हॉस्पीटल येथे जावून विचारपूस केली. संग्राम आणि युवराज गावंडे यांची भेट घेत विचारपूस केली. भाऊंची तब्येत सुधारण्यासाठी सर्वत्र प्रार्थना करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू भाऊ गुलाबराव गावंडे हे अमरावती येथे एका विवाह सोहळ्यासाठी गेले असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. श्वास घेण्यास त्रास होऊ लागला तसेच तीव्र डोकेदुखीचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना तातडीने अमरावती येथील रेनबो इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात त्वरित सिटीस्कॅन करण्यात आल्यानंतर मेंदूत रक्तस्त्राव झाल्याचे निदान झाले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन न्यूरोसर्जन डॉ. स्वरूप गांधी, डॉ. अजिंक्य जामटे आणि डॉ. श्याम राठी यांच्या तज्ज्ञ पथकाने तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. सुमारे तीन तास चाललेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेद्वारे मेंदूतील रक्तस्त्राव नियंत्रणात आणण्यात आला. ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली असून गावंडे यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत असल्याची माहिती मिळाली आहे.



गुलाबराव गावंडे हे राज्याचे माजी क्रीडामंत्री तसेच जनसामान्यांशी घट्ट नाळ जोडलेले लोकनेते म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय स्तरावरील कबड्डीपटू म्हणून त्यांनी क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. वयाच्या ७४ व्या वर्षीही ते सामाजिक, धार्मिक, राजकीय तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होत असतात. शस्त्रक्रियेदरम्यान त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने अमरावती येथे उपस्थित होते. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी राज्यभरातील समर्थक आणि हितचिंतकांकडून प्रार्थना व्यक्त करण्यात येत आहेत.

### आजारांनाही पराभूत करणारा लढवय्या!

राजकारण, समाजकारण आणि क्रीडा क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे माजी क्रीडामंत्री गुलाबराव गावंडे हे खऱ्या अर्थाने लढवय्या व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय कबड्डीपटू म्हणून मैदानावर अनेक आव्हानांवर मात करणाऱ्या गावंडे यांनी सार्वजनिक जीवनातही जनतेशी कायम घट्ट नाळ जपली आहे. अचानक उद्भवलेल्या मेंदूतील रक्तस्त्रावासारख्या गंभीर आजारावर यशस्वी शस्त्रक्रियेनंतर त्यांनी पुन्हा एकदा जिद्दीने मात करण्याची चिन्हे दाखवली आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू आहेत. मैदानावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करणारा हा लढवय्या नेता, स्वतःवर आलेल्या संकटालाही त्याच जिद्दीने पराभूत करत आहे, अशी भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट
विविधा
२
बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

## पर्यावरण संरक्षण काळाची गरज

पर्यावरण संरक्षण म्हणजे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक आवरण, हवा, पाणी आणि वनांचे रक्षण करणे होय. यामध्ये अधिक झाडे लावणे, पाणी व ऊर्जेची बचत करणे आणि कचरा कमी करणे या मुख्य उपायांचा समावेश होतो.

पर्यावरण संरक्षणाचे मुख्य उपाय: अधिक रोपे लावणे आणि जंगलतोड थांबवणे, पाणी आणि विजेचा कमी व योग्य वापर करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि वस्तूंचा पुनर्वापर करणे (रिसायकल).

गाडीऐवजी चालत जाणे, सायकलीचा वापर करणे किंवा सार्वजनिक वाहतुकीची निवड करणे, पर्यावरण सुरक्षा म्हणजे आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक आवरणाला संरक्षण देणे आणि ते जीवनासाठी अनुकूल ठेवणे. पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करण्याच्या उद्देशाने १९८६ मध्ये हा कायदा करण्यात आला.

# ‘हे माणसासाठी एक छोटे पाऊल असले तरी मानवजातीसाठी मोठी झेप’!

नील एल्डन आर्मस्ट्राँग यांचा जन्म ५ ऑगस्ट १९३० मध्ये झाला. ते एक अमेरिकन अंतराळवीर आणि वैमानिक अभियंता होते, जे १९६९ च्या अपोलो ११ मोहिमेचे कमांडर म्हणून चंद्रावर पाऊल ठेवणारे पहिले व्यक्ती ठरले. ते नौदल वैमानिक , चाचणी पायलट आणि विद्यापीठाचे प्राध्यापक देखील होते.

आर्मस्ट्राँग यांचा जन्म आणि संगोपन ओहायोमधील वापाकोनेटाजवळ झाले. त्यांनी पर्ड्यू विद्यापीठात एरोनॉटिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश घेतला, जिथे हॉलोवे योजनेंतर्गत अमेरिकन नौदलाने त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलला होता. ते १९४९ मध्ये मिडशिपमन आणि पुढच्या वर्षी नौदल वैमानिक बनले. त्यांनी कोरियन युद्धात भाग घेतला, जिथे त्यांनी यूएसएस एसेक्स या विमानवाहू जहाजावरून ग्रुमन एफ९एफ पँथर हे विमान उडवले. युद्धानंतर, त्यांनी पर्ड्यूमधून आपली पदवी पूर्ण केली आणि कॅलिफोर्नियातील एडवर्ड्स एअर फोर्स बेस येथील नॅशनल ॲडव्हायझरी कमिटी फॉर एरोनॉटिक्स हाय-स्पीड फ्लाइट स्टेशनवर चाचणी वैमानिक बनले. ते सेंच्युरी सिरीजच्या लढाऊ विमानांचे प्रकल्प वैमानिक होते आणि त्यांनी नॉर्थ अमेरिकन एक्स-१५ हे विमान सात वेळा उडवले. ते अमेरिकन हवाई दलाच्या ‘ मॅन इन स्पेस सूनेस्ट’ आणि ‘एक्स-२० डायना-सोअर’ या मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमांमध्येही सहभागी होते.

आर्मस्ट्राँग १९६२ मध्ये निवडलेल्या दुसर्‍या गटात नासाच्या अंतराळवीर दलात सामील झाले. त्यांनी मार्च १९६६ मध्ये जेमिनी ८ चे कमांड पायलट म्हणून आपले पहिले अंतराळ उड्डाण केले आणि अंतराळात उड्डाण करणारे नासाचे पहिले नागरी अंतराळवीर बनले. पायलट डेव्हिड स्कॉट यांच्यासोबतच्या या मोहिमेदरम्यान, त्यांनी दोन अंतराळयानांचे पहिले डॉकिंग केले; अडकलेल्या थ्रस्टरमुळे यान धोकादायकरीत्या कलंडू लागले, तेव्हा आर्मस्ट्राँग यांनी ते स्थिर करण्यासाठी आपल्या पुनर्प्रवेश नियंत्रण इंधनाचा काही भाग वापरल्यानंतर ही मोहीम रद्द करण्यात आली. अपोलो ११ चे कमांडर म्हणून आर्मस्ट्राँग यांच्या दुसर्‍या आणि शेवटच्या अंतराळ उड्डाणाच्या प्रशिक्षणादरम्यान , अपघात होण्याच्या काही क्षणांपूर्वी त्यांना लुनार लँडिंग रिसर्च व्हेईकलमधून बाहेर पडावे लागले.

२० जुलै १९६९ रोजी, आर्मस्ट्राँग आणि अपोलो ११ लुनार मॉड्यूल (एलएम) चे पायलट बझ आल्ड्रिन चंद्रावर उतरणारे पहिले लोक ठरले , आणि दुसर्‍या दिवशी त्यांनी लुनार मॉड्यूल लईगल अंतराळयानाच्या बाहेर अडीच तास घालवले, तर मायकल कॉलिन्स अपोलो कमांड मॉड्यूल कोलंबियामध्ये चंद्राच्या कक्षेत राहिले. जेव्हा आर्मस्ट्राँगने चंद्राच्या पृष्ठभागावर पहिले पाऊल ठेवले, तेव्हा ते प्रसिद्धपणे म्हणाले: ‘ हे माणसासाठी एक छोटे पाऊल आहे, मानवजातीसाठी एक मोठी झेप आहे. याचे जगभरातील अंदाजे ५३० दशलक्ष दर्शकांसाठी थेट प्रक्षेपण करण्यात आले. अपोलो ११ हा अंतराळ शर्यतीत अमेरिकेचा एक मोठा विजय होता , कारण १९६१ मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी दशकाच्या अखेरीस ‘चंद्रावर माणसाला उतरवणे आणि त्याला पृथ्वीवर सुरक्षितपणे परत आणणे’ हे राष्ट्रीय उद्दिष्ट प्रस्तावित केले होते. कॉलिन्स आणि आल्ड्रिन यांच्यासोबत, आर्मस्ट्राँग यांना राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या हस्ते ‘प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडम’ प्रदान करण्यात आले आणि त्यांना १९६९ चा ‘ कॉलिअर ट्रॉफी’ मिळाली. राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी १९७८ मध्ये त्यांना ‘ काँग्रेसनल स्पेस मेडल ऑफ ऑनर’ प्रदान केले , १९७९ मध्ये ‘नॅशनल एव्हिएशन हॉल ऑफ फेम’ मध्ये त्यांचा समावेश करण्यात आला आणि २००९ मध्ये त्यांना त्यांच्या माजी सहकार्‍यांसह ‘ काँग्रेसनल गोल्ड मेडल’ प्रदान करण्यात आले.



नील आर्मस्ट्राँग यांची आज जयंती

१९७१ मध्ये नासातून राजीनामा दिल्यानंतर, आर्मस्ट्राँग यांनी १९७९ पर्यंत सिनसिनाटी विद्यापीठाच्या एरोस्पेस अभियांत्रिकी विभागात शिकवले. त्यांनी अपोलो १३ अपघाताच्या चौकशीत आणि स्पेस शटल चॅलेंजर दुर्घटनेची चौकशी करणार्‍या रॉजर्स आयोगावर काम केले. २०१२ मध्ये, वयाच्या ८२ व्या वर्षी, कोरोनरी बायपास शस्त्रक्रियेनंतर झालेल्या गुंतागुंतीमुळे आर्मस्ट्राँग यांचे निधन झाले .

आर्मस्ट्राँगचा जन्म ५ ऑगस्ट १९३० रोजी ओहायो राज्यातील ऑग्लेझ काउंटीमधील ग्रामीण वॉशिंग्टन टाउनशिपमध्ये झाला. तो व्हायोला लुईस (माहेरचे नाव एंजेल) आणि स्टीफन कोनिग आर्मस्ट्राँग यांचा मुलगा होता. तो जर्मन, इंग्लिश, स्कॉट्स-आयरिश, आयरिश आणि स्कॉटिश वंशाचा होता. तो आर्मस्ट्राँग कुळाचा वंशज आहे. त्याला जून नावाची एक धाकटी बहीण आणि डीन नावाचा एक धाकटा भाऊ होता. त्याचे वडील ओहायो राज्य सरकारमध्ये ऑडिटर होते, आणि हे कुटुंब पुढील १४ वर्षांत राज्यात वारंवार स्थलांतरित झाले आणि १६ शहरांमध्ये राहिले. याच काळात आर्मस्ट्राँगचे उड्डाणाबद्दलचे प्रेम वाढले, ज्याची सुरुवात वयाच्या दुसर्‍या वर्षी झाली जेव्हा त्याचे वडील त्याला क्लीव्हलँड एअर रेसेसमध्ये घेऊन गेले होते. तो पाच किंवा सहा वर्षांचा असताना, त्याने वॉरन, ओहायो येथे आपल्या पहिल्या विमान प्रवासाचा अनुभव घेतला, जेव्हा त्याने आणि त्याच्या वडिलांनी फोर्ड ट्रायमोटर (ज्याला ‘टिन गूज़’ असेही म्हटले जाते) मध्ये प्रवास केला. आर्मस्ट्राँगने त्याच्या तरुणपणात मॉडेल विमाने बनवली आणि उडवली.

कुटुंबाचे शेवटचे स्थलांतर १९४४ मध्ये झाले आणि ते वापाकोनेटा येथे परतले, जिथे आर्मस्ट्राँगने ब्लूम हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले आणि वापाकोनेटा एअरफिल्डवर उड्डाणाचे धडे घेतले. त्याने त्याच्या १६ व्या वाढदिवशी विद्यार्थी उड्डाण प्रमाणपत्र मिळवले, त्यानंतर ऑगस्टमध्ये एकट्याने उड्डाण केले, हे सर्व त्याने ड्रायव्हरचा परवाना मिळण्यापूर्वीच केले. तो एक सक्रिय बॉय स्काउट होता आणि त्याने ईगल स्काउटचा दर्जा मिळवला. प्रौढ झाल्यावर, स्काउट्सनी त्याला त्यांच्या डिस्टिंग्विश्ड ईगल स्काउट अवॉर्ड आणि सिल्व्हर बफेलो अवॉर्डने सन्मानित केले. १८ जुलै, १९६९ रोजी चंद्राकडे उड्डाण करत असताना, त्याने आयडाहो येथील नॅशनल स्काउट जॅम्बोरीमधील उपस्थितांना शुभेच्छा पाठवल्या. चंद्रावर जाताना आणि परत येताना त्याने सोबत नेलेल्या काही वैयक्तिक वस्तूंमध्ये वर्ल्ड स्काउट बॅजचा समावेश होता.

वयाच्या १७ व्या वर्षी, १९४७ मध्ये, आर्मस्ट्राँगने इंडियानामधील वेस्ट लाफायेट येथील पर्ड्यू विद्यापीठात एरोनॉटिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास सुरू केला ; तो त्याच्या कुटुंबातील महाविद्यालयात जाणारा दुसरा व्यक्ती होता. आर्मस्ट्राँगला मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) मध्ये देखील प्रवेश मिळाला होता, परंतु १९४५ मध्ये ओहायो स्टेडियममध्ये पर्ड्यू बॉईलमेकर्स आणि ओहायो स्टेट बकयेज यांच्यातील फुटबॉल सामना पाहिल्यानंतर त्याने पर्ड्यूला जाण्याचा निश्चय केला, ज्यामध्ये क्वार्टरबॅक बॉब डीमॉसने बॉईलमेकर्सला अत्यंत प्रतिष्ठित बकयेजवर एक मोठा विजय मिळवून दिला होता. एमआयटीमध्ये शिकलेल्या त्याच्या एका काकांनी त्याला असाही सल्ला दिला होता की, मॅसॅच्युसेट्समधील केंब्रिजला न जाताही त्याला चांगले शिक्षण मिळू शकते. त्याच्या महाविद्यालयाची शिक्षण फी हॉलोवे योजनेअंतर्गत भरण्यात आली होती. यशस्वी अर्जदारांनी दोन वर्षांचा अभ्यास, त्यानंतर दोन वर्षांचे उड्डाण प्रशिक्षण आणि अमेरिकन नौदलात वैमानिक म्हणून एक वर्षाची सेवा आणि मग त्यांच्या पदवीच्या शेवटच्या दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची वचनबद्धता दर्शवली. आर्मस्ट्राँगने नौदल विज्ञानाचे अभ्यासक्रम घेतले नाहीत, तसेच तो नौदल राखीव अधिकारी प्रशिक्षण दलातही सामील झाला नाही. २६ जानेवारी १९४९ रोजी आर्मस्ट्राँगला नौदलातून बोलावण्यात आले, ज्यामुळे त्याला वर्ग ५-४९ सह उड्डाण प्रशिक्षणासाठी फ्लोरिडातील नेव्हल एअर स्टेशन पेन्साकोला येथे हजर व्हावे लागले. वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, तो २४ फेब्रुवारी १९४९ रोजी मिडशिपमन बनला. त्याने ९ सप्टेंबर १९४९ रोजी एकट्याने उड्डाण केले.

७ ऑगस्ट २०१२ रोजी, आर्मस्ट्राँगवर ओहायोच्या फेअरफिल्ड येथील मर्सी हेल्थ फेअरफिल्ड हॉस्पिटलमध्ये कोरोनरी आर्टरी डिसीजपासून आराम मिळवण्यासाठी बायपास शस्त्रक्रिया करण्यात आला. जरी ते बरे होत असल्याची बातमी होती, तरी गुंतागुंत निर्माण झाली आणि २५ ऑगस्ट २०१२ रोजी त्यांचे निधन झाले.

## सार्वजनिक विद्यापीठात कंत्राटी प्राध्यापक भरतीत आवेदन शुल्क आकारण्याबाबत नियमावली हवी

### प्रा. डॉ. संजय खडक्कार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

महाराष्ट्रातील सार्वजनिक विद्यापीठांत सहायक प्राध्यापकांच्या रिक्त पदांवर, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्यासाठी,कंत्राटी पद्धतीने सहायक प्राध्यापक भरती प्रक्रिया राबविली जाते. यामध्ये आवेदन शुल्क आकारण्या बाबतीत नियमावली असावी या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूरचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. संजय खडक्कार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे.

नुकतेक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ इत्यादी सार्वजनिक विद्यापीठे विद्यापीठांच्या कंत्राटी पद्धतीने सहायक प्राध्यापक भरतीच्या जाहिराती प्रकाशित झाल्यात. त्यात मुक्त विद्यापीठ,पुणे विद्यापीठ यांनी आवेदन शुल्क १००० रुपये तर नागपूर विद्यापीठाने ५०० रुपये ठेवले आहे.

उच्च शिक्षणात करिअर करण्यासाठी आज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी नेट/सेट/पीएचडी होताना दिसतात. परंतु मंजूर सहायक प्राध्यापकांची संख्या निश्चितच पात्र उमेदवारांच्या मानाने खूपच कमी असते. त्यामुळे प्रत्येक कंत्राटी सहायक प्राध्यापक पदासाठी किमान १०० च्या वर उमेदवार पात्र असताना दिसतात. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराकडून १ हजार रुपये घेतल्यास, प्रत्येक पदासाठी विद्यापीठ आवेदन शुल्कापोटी लाखों रुपये मिळतात. या वर्षी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ५५ जागा भरल्या, एका पदासाठी किमान १०० अर्ज आले असतील तर आवेदन शुल्कापोटी किमान ५५ लाख रुपये मुक्त विद्यापीठाने कमावले असतील,असा अंदाज आपण करू शकतो.

कंत्राटी तत्त्वावरील पदे ही केवळ ६ ते ११ महिन्यांच्या अत्यंत अल्प कालावधीसाठी असतात.* कोणतीही नोकरीची शाश्वती किंवा सुरक्षा नसताना, बेरोजगार असलेल्या नेट/सेट/पीएचडी धारक उमेदवारांकडून १,०००/- रुपये शुल्क वसूल करणे नैतिकदृष्ट्या अत्यंत चुकीचे आहे.केवळ अर्जांची छाननी आणि मुलाखतीच्या खर्चाचे कारण पुढे करून गरिबांच्या मुलांकडून शुल्क वसूल करणे अनाकलनीय आहे.

महाराष्ट्र शासनाने सरळसेवा/कायमस्वरूपी भरतीसाठी परीक्षा घेणाऱ्या कंपन्यांच्या शुल्कापोटी १,०००/- रुपयांची मर्यादा निश्चित केली आहे. कंत्राटी पदांसाठी कोणतीही मोठी परीक्षा घेतली जात नाही,तरी विद्यापीठ प्रशासन याच शासन निर्णयाचा चुकीचा आधार घेऊन तात्पुरत्या पदासाठीही तेवढीच फी लादत आहे.

राज्यातील उच्चशिक्षित तरुण एकाच वेळी अनेक विद्यापीठांमध्ये अर्ज करत असतात. प्रत्येक ठिकाणी १,०००/- रुपये फी आणि मुलाखतीसाठी प्रवासाचा खर्च जोडल्यास, *बेरोजगारांना हजारो रुपयांचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.*

तरी आपल्याला नम्र विनंती की विद्यापीठातील कंत्राटी आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या सहायक प्राध्यापक व इतर सर्व भरती प्रक्रियासाठी अर्ज शुल्क पूर्णपणे रद्द करण्यात यावे, किंवा प्रशासकीय खर्च म्हणून केवळ १०० रुपये ते २०० रुपयांचे नाममात्र शुल्क आकारण्यात यावे, व राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांसाठी या बाबत नियमावली बनवावी,असे निर्देश संबंधितांना द्यावे असे प्रा.डॉ.संजय त्रिंबकराव खडक्कार यांनी ४ ऑगस्ट च्या पत्रात नमूद केले आहे.

## आजच्या दिवशी जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा झाला होता रद्द!

५ ऑगस्ट २०१९ रोजी, भारत सरकारने जम्मू आणि काश्मीरला भारतीय संविधानाच्या कलम ३७० अंतर्गत दिलेला विशेष दर्जा, किंवा स्वायत्तता रद्द केली. हा प्रदेश भारताद्वारे एक राज्य म्हणून प्रशासित आहे आणि त्यात काश्मीरचा मोठा भाग समाविष्ट आहे जो १९४७ पासून भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्यात वादाचा विषय राहिला आहे.

रद्द करण्यासोबत भारत सरकारने केलेल्या कारवाईमध्ये काश्मीर खोऱ्यातील दळणवळण बंद करणे समाविष्ट होते, जे ५ महिन्यांनंतर पूर्ववत करण्यात आले. कोणताही उठाव रोखण्यासाठी हजारो अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले होते. माजी मुख्यमंत्र्यांसह अनेक प्रमुख काश्मिरी राजकारण्यांना ताब्यात घेण्यात आले. सरकारी अधिकाऱ्यांनी हे निर्बंध हिंसाचार टाळण्यासाठी असल्याचे वर्णन केले, आणि राज्यातील लोकांना आरक्षण, शिक्षणाचा अधिकार आणि माहितीचा अधिकार यांसारख्या सरकारी योजनांचा लाभ घेता यावा यासाठी हे रद्द करण्याचे समर्थन केले. काश्मीर खोऱ्यातील प्रतिक्रिया दळणवळण स्थगित करून आणि संचारबंदी ( कलम १४४ ) लागू करून प्रभावीपणे दडपण्यात आल्या.




हिंदू-बहुल जम्मू आणि बौद्ध-बहुल लडाख प्रदेशातील लोकांनी या निर्णयाचे स्वागत केले आणि त्याच्या समर्थनार्थ उत्सव साजरे केले, तथापि, नंतरच्या प्रदेशातील मुस्लिमांकडून काही विरोध झाल्याचेही वृत्त आहे. अनेक राष्ट्रवाद्यांनी हा निर्णय काश्मीरमध्ये सार्वजनिक सुव्यवस्था आणि समृद्धीची नांदी ठरेल असे घोषित करून आनंद साजरा केला. भारतातील राजकीय पक्षांमध्ये, सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने आणि इतरांबरोबरच बहुजन समाज पक्ष , आम आदमी पक्ष , एआयएडीएमके , तेलगू देसम पक्ष , वायएसआर काँग्रेस पक्ष , बीजेडी , जनता दल (युनायटेड) आणि शिवसेना यांनी हा निर्णय रद्द करण्यास पाठिंबा दिला . त्याला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस , जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स , जम्मू आणि काश्मीर पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी , भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) , भारतीय कम्युनिस्ट पक्ष , तृणमूल काँग्रेस आणि डीएमके यांनी विरोध केला होता .

भारताच्या राष्ट्रपतींनी अनुच्छेद ३६७ च्या अधिकाराखाली एक आदेश जारी केला, ज्याद्वारे १९५४ चा प्रचलित राष्ट्रपती आदेश रद्द करण्यात आला आणि राज्याला देण्यात आलेल्या स्वायत्ततेच्या सर्व तरतुदी रद्दबातल ठरवण्यात आल्या. गृहमंत्री यांनी भारतीय संसदेत एक पुनर्रचना विधेयक सादर केले, ज्याद्वारे राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन करून त्यावर नायब राज्यपाल आणि एकसदनीय विधानमंडळाद्वारे शासन करण्याची मागणी करण्यात आली. अनुच्छेद ३७० अंतर्गत तात्पुरता विशेष दर्जा रद्द करण्याची मागणी करणारा ठराव आणि राज्याच्या पुनर्रचनेचे विधेयक ५ ऑगस्ट २०१९ रोजी राज्यसभेत – भारताच्या संसदेचे वरिष्ठ सभागृह – चर्चेसाठी मांडण्यात आले आणि मंजूर करण्यात आले. ६ ऑगस्ट रोजी, लोकसभेत – भारताच्या संसदेचे कनिष्ठ सभागृह – पुनर्रचना विधेयकावर आणि दर्जा रद्द करण्याची शिफारस करणाऱ्या ठरावावर चर्चा करून ते मंजूर करण्यात आले.

भारतीय संविधानाच्या कलम ३७० ने जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा दिला — हे भारतीय उपखंडाच्या उत्तर भागात वसलेले एक राज्य आहे आणि मोठ्या काश्मीर प्रदेशाचा एक भाग आहे , जो भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्यातील वादाचा विषय राहिला आहे. या कलमाने जम्मू आणि काश्मीरला स्वतंत्र संविधान , राज्याचा ध्वज आणि राज्याच्या अंतर्गत प्रशासनावर स्वायत्तता ठेवण्याचा अधिकार दिला. जम्मू आणि काश्मीरच्या संविधान सभेला , तिच्या स्थापनेनंतर, राज्याला लागू होणाऱ्या भारतीय संविधानाच्या कलमांची शिफारस करण्याचा किंवा कलम ३७० पूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार देण्यात आला. राज्याच्या संविधान सभेशी सल्लामसलत केल्यानंतर, १९५४ चा राष्ट्रपती आदेश जारी करण्यात आला, ज्यामध्ये राज्याला लागू होणाऱ्या भारतीय संविधानाच्या कलमांचा उल्लेख होता. संविधान सभेने कलम ३७० रद्द करण्याची शिफारस न करता स्वतःला विसर्जित केले, आणि हे कलम भारतीय संविधानाचे कायमस्वरूपी वैशिष्ट्य बनले आहे असे मानले गेले. या कलमाने, कलम ३५ ए सह , असे परिभाषित केले की जम्मू आणि काश्मीर राज्यातील रहिवासी इतर भारतीय राज्यांतील रहिवाशांच्या तुलनेत नागरिकत्व , मालमत्तेची मालकी आणि मूलभूत हक्कांशी संबंधित कायद्यांसह, कायद्यांच्या वेगळ्या संचाअंतर्गत राहतात.

१९५४ ते २०११ दरम्यान, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखालील विविध केंद्र सरकारांच्या आणि नॅशनल कॉन्फरन्ससारख्या स्थानिक पातळीवर निवडलेल्या राज्य सरकारांच्या काळात, भारताने कलम ३७० च्या तरतुदींचा वापर करून, राज्य सरकारच्या संमतीने जम्मू आणि काश्मीरमध्ये भारतीय संविधान लागू करण्यासाठी आणि राज्याची स्वायत्तता कमी करण्यासाठी राष्ट्रपतींचे आदेश जारी केले. कलम ३७० अंतर्गतचे हे पूर्वीचे राष्ट्रपतींचे आदेश वादग्रस्त असून ते काश्मीर विवादाचा विषय आहेत. काश्मीरचे अभ्यासक आणि राज्यशास्त्रज्ञ सुमंत्र बोस , १९५३-६३ या काळातील राजकारणाचा सारांश या शब्दांत मांडतात, ज्या दरम्यान बक्षी गुलाम मोहम्मद यांनी जम्मू आणि काश्मीरचे पंतप्रधान म्हणून काम केले.

बक्षी गुलाम मोहम्मद यांचा कार्यकाळ ऑक्टोबर १९६३ पर्यंत, पूर्ण दशकभर चालला. त्या दशकातील घटनाक्रमावरून बक्षी आणि भारत सरकार यांच्यात एक करारबद्ध संबंध असल्याचे स्पष्टपणे सूचित होते, ज्यानुसार नवी दिल्लीच्या अटींवर जम्मू आणि काश्मीरचे भारतात ‘एकीकरण’ सुलभ करण्याच्या बदल्यात त्यांना श्रीनगरमध्ये एक अप्रतिनिधिक, उत्तरदायित्व नसलेले सरकार चालवण्याची परवानगी दिली जाणार होती. याचे दुहेरी परिणाम झाले: जम्मू आणि काश्मीरमधील कायद्याचे राज्य आणि लोकशाही संस्थांचे खच्चीकरण; आणि जम्मू आणि काश्मीरच्या स्वायत्ततेची घसरण, जी (अनुच्छेद ३७० नुसार) जम्मू आणि काश्मीरच्या सरकारच्या ‘संमतीने’ साध्य झाली होती—ज्यात नवी दिल्लीच्या आश्रित राजकारण्यांच्या एका संमिश्र गटाचा समावेश होता.पुढे, बोस यांच्या मते, १९५४ चा राष्ट्रपतींचा आदेश आणि त्यानंतरच्या आदेशांनी ‘अनुच्छेद ३७० चा अंत’ सुरू केला आणि तेव्हापासून ते ‘अक्षरशः आणि भावनेने प्रभावीपणे मृत झाले आहे’.

भारत आणि पाकिस्तानची धार्मिक आधारावर फाळणी झाल्यापासून, जम्मू आणि काश्मीरसह भारतातील हिंदू राष्ट्रवादी संघटनांनी असे म्हटले आहे की जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य, अतूट भाग आहे. सत्यापनासाठी अवतरण आवश्यक आहे. पूर्वीच्या निवडणूक जाहीरनाम्यांप्रमाणेच, भारतीय जनता पक्षाने २०१९ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीसाठी आपल्या प्रचाराच्या आश्वासनांमध्ये जम्मू आणि काश्मीरच्या एकीकरणाचा समावेश केला होता . भाजपने आणि त्यांच्या मित्रपक्षांनी भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या लोकसभेत प्रचंड बहुमत मिळवले.


# साताऱ्यात प्रतिसरकारची स्थापना करणारे क्रांतिकारक!

क्रांतिसिंह नाना पाटील हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी राजकारणी होते. क्रांतिसिंह नाना पाटील हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे क्रांतिकारक मानले जातात. त्यांचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने सांगली, सातारा या परिसरामध्ये होते.

नाना पाटील यांच्या वरती प्रारंभीच्या काळात सत्यशोधक विचारांचा प्रभाव होता. पुढील काळात ब्रिटिशांच्या अन्याय कारक राजवटीस आव्हान देण्यासाठी त्यांनी क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला. सातार्‍यातील प्रतिसरकारच्या स्थापनेत त्यांचा वाटा महत्त्वाचा होता. नाना पाटील यांनी सातार्‍यामध्ये प्रतिसरकारची स्थापना करून महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीला मोठे योगदान दिले. भूमिगत चळवळीच्या माध्यमातून त्यांनी प्रतिसरकारची स्थापना केली. प्रतिसरकारची स्थापना झाल्यावर ग्रामीण भागात ब्रिटिशांचे अस्तित्व नाममात्र राहिले. नाना पाटील यांनी युवकांची संघटना स्थापन करून इंग्रजांपुढे जबरदस्त आव्हान निर्माण केले. प्रती सरकारचे नेते या नात्याने त्यांनी केलेल्या कार्यामुळेच त्यांना क्रांतिसिंह म्हणून ओळखले जाऊ लागले. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीच्या भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये नाना पाटलांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. या काळामध्ये महाराष्ट्रातील सातारा, सांगली या परिसरात नाना पाटलांची ब्रिटिशांवर एक मोठी दहशद निर्माण झाली होती. प्रतिसरकार अथवा ‘पत्री सरकार’ म्हणून या काळात ते ओळखले गेले. मंत्र प्राप्तीनंतर हे नाना पाटील यांनी सातारा सांगली परिसरामध्ये आपले सामाजिक कार्य पुढे चालू ठेवले.

महाराष्ट्रात (प्रामुख्याने सातारा, सांगली भागात) स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे, तसेच पत्री सरकार किंवा प्रतिसरकार हा समांतर शासनाचा एकमेवाद्वितीय प्रयोग राबवणारे लढवय्ये राजकीय कार्यकर्ते म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील होत. नाना पाटील यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील बहे या गावी ३ ऑगस्ट १९०० रोजी त्यांचे मामा कै.भाऊ बाळा मुसळे यांच्या घरी झाला. लहानपणापासूनच नानांना दणकट शरीराचे वरदान लाभले होते. म्हणूनच पुढील काळातही त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्वामुळेच लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. नाना पाटील यांचे गाव येडेमच्छिंद्र तर कर्मभूमी संपूर्ण महाराष्ट्र होती. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नानांनी काही काळ तलाठी म्हणून नोकरी केली. पण समाजकारण व राजकारणाची ओढ असलेले नाना लवकरच नोकरीतून बाहेर पडले. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीपासूनच त्यांचा स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होता. स्वातंत्र्यलढा आणि बहुजन समाजाचा विकास या दोन्ही मार्गांनी त्यांचे कार्य चालू होते.

१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीचे कार्य करण्यासाठी नाना पाटलांनी नोकरीचा त्याग केला. त्यांनी ग्रामीण जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देऊन, जनतेला धाडसी बनवण्याचा प्रयत्न केला. नानांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता. तसेच लोकांच्या भाषेत प्रभावी भाषणे करून, त्यांच्यात प्रेरणा उत्पन्न करण्याची हातोटी नानांकडे होती. ग्रामीण भागातील, बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेणे हे क्रांतिसिंहांचे प्रमुख योगदान होय. ब्रिटिश शासनाला समांतर अशी शासन यंत्रणा उभी केली पाहिजे असा नाना पाटलांचा विचार होता. ‘आपुला आपण करू कारभार’ हे सूत्र त्यांनी इ.स. १९४२च्या चले जाव चळवळीत प्रत्यक्ष अंमलात आणले. आपल्या देशाचा कारभार आपणच केला पाहिजे या जाणिवेतून प्रतिसरकार ही संकल्पना नानांनी प्रत्यक्षात आणली होती. प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायालये, अन्नधान्य पुरवठा, बाजार व्यवस्था यासारखी लोकोपयोगी कामे केली जात. ब्रिटिशांची राज्यव्यवस्था नाकारून त्यांनी १९४२ च्या दरम्यान सातारा जिल्ह्यात स्वतंत्र राज्याची स्थापना केली. प्रतिसरकारचा प्रचार ज्येष्ठ कवी ग. दि. माडगुळकर लिखित पोवाड्यांच्या माध्यमातून आणि शाहीर निकम यांच्या खड्या आवाजाद्वारे केला जात होता.



क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती

नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारमध्ये विविध दलांची स्थापना झाली. त्यातल्या एका दलाचे-तुफान दलाचे- फील्ड मार्शल जी.डी. लाड (बापू) आणि कॅप्टन आकाराम (दादा) पवार होते. ह्या दलाची कुंडल येथे युद्धशाळा होती. या युद्धशाळेतून प्रशिक्षित अशा पाच हजारांवर जवानांच्या दोनशे शाखा स्वातंत्र्यपूर्व काळात गावोगाव काम करीत. तलवारी, जांबिया या परंपरांगत हत्याराबरोबरच पिस्तूल बॉंबगोळे फेकण्याचे प्रशिक्षण या जवानांना होते. प्रतिसरकारने गावटग्यांवर बसवलेल्या दहशतीमुळे या सरकारची पत्री सरकार अशी ओळख तयार झाली. या प्रतिसरकारच्या माध्यमातून बाजारव्यवस्था, अन्नधान्य पुरवठा, भांडणतंटे सोडवण्यासाठी लोकन्यायालयांची स्थापना, दरोडेखोरांना-पिळवणूक करणार्‍या सावकारांना -पाटलांना कडक शिक्षा - अशी अनेक समाजोपयोगी कामे करण्यात येत होती. या सरकार अंतर्गत नाना पाटील यांनी ‘तुफान सेना’ या नावाने सैन्य दलाची स्थापना केली होती. ब्रिटिशांच्या रेल्वे, पोस्ट आदी सेवांवर हल्ला करून त्यांना नामोहरम करण्याचे तंत्रही नाना पाटील यांनी यशस्वीरीत्या राबवले. १९४३ ते १९४६ या काळात सातारा व सांगली जिल्ह्यातील सुमारे १५०० गावांत प्रतिसरकार कार्यरत होते. या संकल्पनेचा प्रयोग पुढे देशातही अनेक ठिकाणी करण्यात आला.

१९२० ते १९४२ या काळात नाना ८-१० वेळा तुरुंगात गेले. १९४२ ते ४६ या काळात ते भूमिगतच होते. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी बक्षीस लावले, जंगजंग पछाडले पण क्रांतिसिंह ब्रिटिशांना सापडले नाहीत. ते भूमिगत असताना ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर जप्ती आणली, त्यांची जमीनही सरकारजमा केली. याच काळात त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. क्रांतिसिंहांनी आपला जीव धोक्यात घालून, धावपळीत मातोश्रींवर अंत्यसंस्कार केले होते. भारताला स्वातंत्र्य मिळणार हे नक्की झाल्यावरच (१९४६) क्रांतिसिंह कर्‍हाड तालुक्यात प्रकट झाले. त्यांच्यावर महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा तसेच राजर्षी शाहूंच्या कार्याचा प्रभाव होता. त्यांनी ‘गांधी -विवाह’ ही अतिशय कमी खर्चात विवाह करण्याची पद्धत रुजवण्याचा प्रयत्न केला, तसेच शिक्षण प्रसार, ग्रंथालयांची स्थापना, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामीण जनतेची व्यसनमुक्ती या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य केले. त्यांच्यामुळे शाहीर निकम, नागनाथअण्णा नायकवडी यांसारखे कार्यकर्ते घडले.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रामुख्याने सांगली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सातत्याने प्रकाशात असणाऱ्या क्रांतिसिंहांचे ६ डिसेंबर इ.स. १९७६ वाळवा मध्ये निधन झाले. मला वाळव्यामधेच दहन करण्यात यावे ही त्याची इच्छा होती त्यानुसार वाळव्यामधेच दहन करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड ३

बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# चिखलदरासह गाविलगड किल्ला, नरनाळा किल्ल्याच्या पर्यटन विकासाला गती द्या!

## आ. रवी राणा यांचे निर्देश, मंत्रालयात समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



**अमरावती :** कर्जत एन डी फिल्म स्टुडिओ गोरेगावचे धर्तीवर चिखलदरा येथे फिल्म स्टुडीओ उभारा, विदर्भाचे नंदनवन चिखलदरा, गाविलगड किल्ला, नरनाळा किल्ला यांच्या पर्यटन विकासाला गती द्या, असे निर्देश अध्यक्ष आ.रवी राणा यांनी समितीला दिले.

राज्यातील गरजू आणि पात्र कलावंतांना थकीत मानधन तातडीने वितरित करण्यात यावे, 'गरजू कलावंत' या संकल्पनेची स्पष्ट व्याख्या निश्चित करण्यात यावी तसेच राज्यातील ज्येष्ठ व गरजू कलावंतांचा शोध घेऊन त्यांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संकलित करून समितीसमोर सादर करण्यात यावी, असे निर्देश विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी मंत्रालयात झालेल्या समितीच्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत सन २०१५ पासून प्रलंबित असलेल्या मानधन प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला. अनेक प्रस्ताव अद्याप मंजूर न झाल्याबद्दल समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी पात्र लाभार्थ्यांची पडताळणी करून सविस्तर अहवाल समितीकडे सादर करावा, तसेच लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन पात्र कलावंतांचे थकीत मानधन तातडीने वितरित करावे, असे निर्देश देण्यात आले.

पर्यटन विकासाबाबत चित्रनगरी, राधानगरी, भुदरगड आणि इतर महत्त्वाच्या पर्यटनस्थळांचा पर्यटन विकास आराखड्यात समावेश करून त्यांचा सर्वांगीण विकास करावा, तसेच पर्यटन हब म्हणून आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला. तसेच चिखलदरा, धारणी, प्राचीन गाविलगड किल्ला आणि नरनाळा किल्ल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून पर्यटन विकासाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले. गड-किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत समितीने विशेष भर देत राज्यातील ऐतिहासिक किल्ल्यांवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात आणि किल्ल्यांवर घडणाऱ्या अपघात व अनुचित घटना रोखण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. ऐतिहासिक नरनाळा आणि गाविलगड किल्ल्यांकडे विशेष लक्ष वेधत या दोन्ही किल्ल्यांच्या संवर्धन, दुरुस्ती, संरक्षण आणि पर्यटन विकासासाठी आवश्यक सर्व उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले. या बैठकीस विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्यासह समितीचे सदस्य आमदार राजेश पवार, आमदार समीर मेघे, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, आमदार विनोद अग्रवाल, आमदार विक्रम पाचपुते, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार पराग शाह, आमदार रमेश कराड, आमदार किशोर पाटील, आमदार अमोल पाटील, आमदार प्रदीप जयस्वाल, आमदार किरण सामंत, आमदार हिरामण खोसकर, आमदार संजय बनसोडे, आमदार दौलत दरोडा, आमदार वरुण सरदेसाई, आमदार अमित झनक आणि आमदार राजू खरे यांच्यासह पर्यटन विभागाचे संचालक विकास पानसरे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे (एमटीडीसी) व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, सहसंचालक संतोष जाधव, सांस्कृतिक कार्य विभागाचे अधिकारी गि. नि. यादव, सुनिल किसन सूर्यवंशी, सुमंत पास्टे, नरेश वान्हळ, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या संचालक तेजस मदन गर्णे, पर्यटन विभागाचे उपसचिव विजय कृष्णाजी पोवार व संजय रोकडे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, विक्रम देशमुख, यशवंत थोरात, राहुल पवार, संसदीय कार्य विभागाचे अवर सचिव अनिल गणे, कार्यकारी अभियंता सचिन पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देश

»बैठकीत समितीने प्रलंबित आश्वासनांची वेळेत पूर्तता करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून निश्चित कालमर्यादेत अहवाल सादर करावेत, असे निर्देश देत कलावंत कल्याण, पर्यटन विकास, गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि फिल्म सिटी व्यवस्थापन या विषयांवर तातडीने प्रभावी कार्यवाही करण्यावर भर दिला.

» जिल्ह्यात १०० गरजू कलावंतांना मानधन देण्याचा प्रोविजन आहे परंतु लोकंप्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यांचे शिफारशीने ते प्रस्ताव तपासून तातडीने वितरित करा.

-आ.रवी राणा,
विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष

## 'भारत कृषक'ची वृक्षरोपण मोहीम सुरु

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला:** १ ऑगस्ट २०२६ पासुन भारत कृषक समाजाची राज्यभर वृक्षारोपण मोहिमेची सुरूवात भंडारा, चंद्रपुर जिल्हयापासून पवनी, मोहाडी, वरोरा, भ्रदावती येथील शाळा, कॉलेज, पोलीस स्टेशन, मंदिर, कॉलनीज, कार्यालय अशा विविध ठिकाणी वृक्षारोपण करून करण्यात आली.त्यावेळी शाळेच्या मुला-मुलींनी, फ्रेन्डशिप डे च्या निमित्याने झाडालाच मित्र बनवून त्याची देखभाल करून त्याला जगवण्याची जबाबदारी सुध्दा घेतली. यावेळी चेअरमन डॉ. प्रकाश मानकर, डॉ. रमेश ठाकरे, राजेन्द्र गावंडे, डॉ. यशवंत घुमे, प्रा. नामदेव उमाळे, प्रा. काकडे, प्रा. आमानकर, प्रा.डी सावे, पोलीस उपनिरिक्षक योगेश्वर पारधी, अविनाश चौधरी, देवा मिरासे, मदनलाल बागडे, विलासराव गायधने, नारायणराव पागोनिवाल, नरेश गोबाडे, सुहासराव टोंग, राजेश्वर गोडे, मेघराम जंजाळ, तुकाराम बोंद्रे, अमोल बान्डबुचे, माधव भारसाकळे, कैलास ईगळे, इत्यादि तसेच शाळा कॉलेजचे मुले-मुली मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

# विनापरवानगी औदुंबराचे वृक्ष तोडल्याचा आरोपीवर गंभीर आरोप

## अकोल्यातील खदान पोलिसांत आरोपीविरुद्ध तक्रार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला:** सहकार नगर परिसरात ६० वर्षे जुने औदुंबराचे धार्मिक पवित्र असलेले झाड विनापरवानगी तोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी वृक्षमित्र अजय गावंडे यांनी खदान पोलीस ठाण्यात आरोपी रौनक भिमजियानी विरुद्ध तक्रार नोंदवली आहे. अकोल्यातील सहकार नगर येथे राहणाऱ्या रौनक भिमजियानी यांनी आपल्या घराच्या बांधकामादरम्यान लगतच्या शासकीय जागेतील ६० वर्षे जुने औदुंबराचे झाड विनापरवानगी तोडल्याचा आरोप आहे. धार्मिकदृष्ट्या अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या आणि परिसरात पूजनीय असलेल्या या वृक्षाची फांद्या छाटून जे सी बी च्या साहाय्याने मुळापासून तोडण्याचा प्रयत्न केला गेला. याप्रकरणी अकोला महानगरपालिकेकडे तक्रार करूनही वृक्षतोड सुरूच राहिल्याने अजय गावंडे यांनी खदान पोलीस ठाण्यात धाव घेतली. या बेकायदेशीर कृत्यामुळे निसर्गाची हानी तर झालीच, शिवाय हिंदू धर्माच्या भावनाही दुखावल्या आहेत. आरोपीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आता होत आहे.



### पेव्हर ब्लॉकसाठी थेट वृक्षांची कत्तल

»अकोला शहरात तीव्र उन्हाळ्यात अकोलेकर होरपळून जातात. तीव्र उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी गोरक्षण वरील सजग नागरिकांनी या रस्त्यावर पाच वर्षांपुर्वी वृक्षारोपण करत झाडे लावले. पण, महापालिकेच्या प्रदूषण मुक्त कार्यक्रमात या ठिकाणी पेव्हर बसविण्यासाठी थेट वृक्षतोड झाल्याचा आरोप वृक्षप्रेमी अजय गावंडे यांनी केला आहे.

» नेहरु पार्क समोरील ही परिस्थिती आहे. या ठिकाणी पाच वर्षापुर्वी लावलेले झाडे जेसीबीच्या सहाय्याने तोडण्यात आले. महापालिकेच्या अभियंत्यांना या विषयीची कुठली ही माहिती नाही. या भागात वृक्षबचाव आणि वृक्ष वाढविण्यासाठी दिवसरात्र एक करणारे अजय गावंडे यांनी या सर्व प्रकाराला विरोध केला. या ठिकाणी लावलेल्या झाडांचे संरक्षण करत त्यांना कुठलीही इजा न होऊ देता पेव्हर बसविण्याचे काम करता येते. पण, बेकायदेशीर वृक्षतोड करुन विकास कामे करु देणार नाही असा स्पष्ट संदेश अजय गावंडे यांनी दिला आहे.

# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचे लाभार्थी वाऱ्यावर

## पोर्टल ठप्प; लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



**अकोला :** राज्यातील लाखो निराधार, वृद्ध आणि दिव्यांग आपल्या उदरनिर्वाहासाठी शासनाच्या संजय गांधी व श्रावण बाळ योजनांवर अवलंबून आहेत. परंतु मागील अनेक दिवसांपासून निराधार लाभार्थ्यांना योजनेचे पैसे न मिळाल्याने त्यांच्यासमोर उपासमारीचे संकट उभे ठाकले आहे . निराधार लाभार्थ्यांसाठी जीवनरेषा ठरलेल्या संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेचे कामकाज 'एसएएस' पोर्टलच्या तांत्रिक बिघाडामुळे ठप्प झाले असून, जिल्ह्यातील लाभार्थ्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. sas.mahait.org हे अधिकृत पोर्टल गेल्या काही दिवसांपासून नियमितपणे सुरू होत नसल्याने योजनांशी संबंधित सर्व ऑनलाइन प्रक्रिया अक्षरशः ठप्प झाल्या आहेत. या गंभीर समस्येकडे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि अकोला तहसीलदारांनी त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी करीत आहेत. तसेच पोर्टल बंद असल्याने नवीन अर्जाची नोंदणी, लाभार्थ्यांची पडताळणी व मंजुरी, त्रुटी दुरुस्ती, डीबीटी संदर्भातील प्रक्रिया तसेच इतर सर्व ऑनलाइन कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. परिणामी निराधार, वृद्ध, दिव्यांग आणि इतर गरजू लाभार्थ्यांना वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून, आर्थिक नुकसानासोबतच मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे. हे पाहता या योजनेचे काम सुरळीत करून निराधार लाभार्थ्यांना त्यांचे मानधन त्वरित मिळावे अशी मागणी होत आहे

## ऑपरेशन प्रहार' अंतर्गत 4 जुगार अड्ड्यांवर धाड

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अकोला:** अकोला शहरातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत धडक कारवाई केली आहे. शहर व परिसरातील ४ वेगवेगळ्या जुगार अड्डयांवर धाडी टाकून पोलिसांनी १८ आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ७५,२३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ३ आणि ४ ऑगस्ट रोजी ही विशेष मोहीम राबवण्यात आली.



# मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी शिंदेंची कडक सूचना; काम करा नाहीतर घरी बसा!

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**मुंबई:** महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी पार पडलेल्या बैठकीपूर्वी मंत्रालयात एक महत्त्वाची घडामोड घडल्याची माहिती समोर आली आहे. दर मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक असते. या बैठकीपूर्वी सत्ताधारी असलेल्या महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वतंत्र बैठका होत असतात. याच बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या काही मंत्र्यांना प्रचंड झापल्याची माहिती समोर आली आहे. एवढेच नव्हे तर आगामी काळात कामगिरी न सुधारल्यास पदावरुन उचलबांगडी करण्याची स्पष्ट ताकीद एकनाथ शिंदे यांनी संबंधित मंत्र्यांना दिल्याचे समजते. यामुळे सध्या शिवसेनेच्या गोटात खळबळ उडाली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, काल झालेल्या प्री कॅबिनेट बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चार मंत्र्यांच्या कामगिरीवर नाराजी व्यक्त केली. 'जनतेची कामे करा , आपल्या मतदारसंघात पक्ष वाढीवर लक्ष द्या. अन्यथा खांदेपालट अटळ आहे', इतक्या स्पष्ट शब्दांमध्ये एकनाथ शिंदे यांनी या मंत्र्यांना झापल्याची माहिती आहे. विदर्भ, वाशीम, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या ठिकाणी शिवसेना पक्षसंघटनेच्या वाढीवर लक्ष द्या. तसेच मंत्री जनतेची कामे



करत नसल्याची खंतही एकनाथ शिंदे यांनी बैठकीत बोलून दाखवल्याचे समजते. मात्र, शिवसेनेतील हे चार मंत्री कोण, याचा तपशील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, आगामी मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेतील कोणत्या मंत्र्यांची विकेट पडणार, याची चर्चा यानिमित्ताने सुरु झाली आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काल रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथील नगरसेवकांच्या प्रशिक्षण शिबिरात त्यांनाही कानपिचक्या दिल्या आहेत. महापालिकेत महासभेत शेवटपर्यंत बसणारा लोकप्रतिनिधी हा काही नाही काही शिकत असतो, काही लोक येतात हजेरी लावतात, इकडेतिकडे बघतात, दोन-चार विषय बोलून निघून जातात. मात्र तेथे ऐकणं महत्त्वाच असतं, यात त्यांनी आपलं स्वतःच उदाहरण देत, मी शेवटच्या बाकावर बसायचो, आता पहिल्या बाकावर आलोय. त्यामुळे शाखाप्रमुख ते राज्याचा मुख्यमंत्री ही सर्व पद आपल्याला मिळतात,परंतु त्यात आपल्या मनापासून आणि प्रामाणिकपणे लोकसेवा आणि जनसेवा हा अंजेंडा असला पाहिजे. मंगळवारी भाईंदरच्या उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधनी येथे कल्याण-डोंबवली महानगरपालिका आणि अंबरनाथ-बदलापूर नगरपरिषद येथील नगरसेवकांच्या प्रशिक्षण शिबीरात ते बोलत होते.

तसेच नगरसेवक हा नगराचा मालक नाही, 'सेवक' आहे. काही नगरसेवकांना वाटतं की मी निवडून आलोय आता प्रभागाचा सात-बारा माझ्या नावावर आहे, असे खडे बोल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरसेवकांच्या प्रशिक्षण शिबीरात सुनावले. नगरसेवकाला आधी नगरपीता म्हणायचे, बाळासाहेब ठाकरेंनी त्याला नगरसेवक असं नाव दिलं. अशी आठवण करुन देत, नगरसेवक हा नगराचा मालक नाही, सेवक आहे. काही नगरसेवकांना वाटतं की मी निवडून आलोय आता प्रभागाचा सात बारा माझ्या नावावर आहे, असं होता कामा नये, असे जे करतात त्यांचं पुढील निवडणूकीत नौ दो ग्यारहा होऊ जातात. त्यामुळे लक्षात ठेवायच की, लोकांनी आपल्याला निवडून दिलं आहे, संधी दिली आहे. असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी नगरसेवकांना दिला.

# झोपडपट्टीवासीयांना लवकर घरे द्या

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी घेतली SRA प्रकल्पांची दखल



**मुंबई:** पुणे आणि मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने करण्यात यावी. यासाठी प्रायोगिक तत्त्वावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि महाप्रीत यांच्या माध्यमातून या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. पुणे आणि मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत राज्यमंत्री माधुरी मिसाळ बोलत होत्या. या बैठकीस पुणे महाप्रीतचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, पुणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके, गृहनिर्माण विभागाचे उपसचिव चंद्रशेखर तरंगे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पुणे आणि मुंबई येथील सुरू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक नियोजन, तांत्रिक बाबी आणि विविध शासकीय यंत्रणांमधील समन्वय यावर चर्चा करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रभावी नियोजनासाठी योग्य सल्लागार संस्था निश्चित करून पुढील कार्यवाहीचा आराखडा तयार करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. तसेच सुरू असलेल्या पुनर्वसन योजनांचे सर्वेक्षण, क्षेत्रनिहाय तपशीलांचे परीक्षण, आवश्यक क्षेत्र दुरुस्ती आणि प्रत्यक्ष स्थळावरील दृश्य पडताळणी यांसह विविध तांत्रिक बाबींचा आढावा घेण्यात आला. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक आणि गतिमान करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, म्हाडा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि इतर संबंधित यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय राखून आवश्यक कार्यवाही निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पुनर्वसन प्रकल्पांशी संबंधित आवश्यक सर्वेक्षण तातडीने पूर्ण करून वस्तुनिष्ठ आणि सविस्तर अहवाल सादर करावा.

# पायधुनी पोलिसांची धडक कारवाई; ड्रग्ज विक्री करणारे 3 आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



मुंबई : वेकायदेशीरपणे गांजा या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्यांविरोधात पायधुनी पोलिसांनी धडक कारवाई करत दोन महिला आणि एका पुरुषाला अटक केली आहे. मरीन बंडर आणि क्लार्क रोड परिसरात छापेमारी करून पोलिसांनी आरोपींकडून एकूण ४२४ ग्रॅम गांजा जप्त केला असून, जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थाची अंदाजे किंमत ३२ हजार ६०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पायधुनी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी गस्ती दरम्यान ही कारवाई केली. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, दिली स्टँड, मरीन बंडर परिसर तसेच क्लार्क रोड, रेल्वे पटरीजवळील भागात गांजा या अंमली पदार्थाची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचून छापेमारी केली. कारवाईदरम्यान गांजाची विक्री करणाऱ्या दोन महिला आणि एका पुरुषाला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये नरेश चीराज कंठेरिया (३९), बेबी बॉक्स शेख (४७) आणि हसमेन शेख (२७) यांचा समावेश आहे. आरोपींकडून एकूण ९ किलो ४२४ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला.

# रायगड जिल्ह्यातील कामगारांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करा

## कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचे निर्देश

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



मुंबई : रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील मे. गार्गी हुट्टेनेस अल्बर्टस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील पात्र कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया प्राधान्याने करण्याचे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज दिले. या कंपनीतील कामगारांच्या विविध प्रश्नांसंदर्भात मंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. विधान परिषद सदस्य आ. भाई जगताप यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या कंपनीतील सुमारे ३०० कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे तसेच त्यांना कायम कामगारांप्रमाणे समान वेतन व सुविधा मिळावी, अशी मागणी भारतीय कामगार कर्मचारी महासंघामार्फत करण्यात आली होती. या बैठकीस आ. भाई जगताप, कामगार विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आय.ए. कुंदन, उपसचिव (कामगार) स्वप्निल कापडणीस, कामगार आयुक्त एच.पी. तुम्मोड यांच्यासह कामगार संघटनेचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी कामगार मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, कामगारांचे हित आणि त्यांच्या उदरनिर्वाहाचे संरक्षण करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. समान कामासाठी समान वेतन हे तत्त्व लक्षात घेऊन संबंधित कंपनीने कामगारांच्या तक्रारींची वस्तुनिष्ठ पद्धतीने पडताळणी करावी.

या प्रकरणी कोणत्याही कामगारावर अन्याय होणार नाही, याची शासन पूर्ण काळजी घेईल. अधिकाऱ्यांनी कायदेशीर तरतुदींनुसार सर्व बाबींची तत्परतेने पडताळणी करून याबाबतचा अहवाल विहित वेळेत सादर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, संबंधित कामगार संघटना आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यात सामोपचाराने व सकारात्मक चर्चेतून हा प्रश्न सोडवण्यात यावा. कामगारांच्या हक्कांबाबत शासन गंभीर असून, न्याय मिळवून देण्यासाठी सर्व स्तरांवर पाठपुरावा करण्यात येईल. जे कामगार कायमस्वरूपी सेवेसाठी पात्र आहेत, त्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची प्रक्रिया प्राधान्याने करावी. त्यासाठी कामगार संघटनाच्या प्रतिनिधीना विश्वासात घ्यावे आणि हा प्रश्न कालबद्ध पद्धतीने सोडवावा असे निर्देश मंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी दिले.

# बेस्ट बस प्रवाशांचे मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीस अटक करुन 135 मोबाईल जप्त केले, तीन गुन्हे उघड

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



**मुंबई :** बेस्ट बस मधील प्रवाशांचे मोबाईल चोरी प्रकरणी पोलिसांनी तीन गुन्हे उघड केले. एकूण १३५ मोबाईल एका टोळी कडून जप्त करण्यात यश मिळवले. एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत राहणारे जगत ज्योती मोहांती, ओएनजीसी कॉलनी, पुनमनगर, अंधेरी पूर्व, मुंबई यांनी पोलीस ठाण्यास येवून कळविले की, ०६/०६/२०२६ रोजी दुपारी ०२.१५ वाजेच्या सुमारास सिप्झ बस स्टॉप, एमआयडीसी सेन्ट्रल रोड, अंधेरी पुर्व मुंबई येथुन अंधेरी स्टेशन करिता जाणारी बेस्ट बस रूट क. ४१५ या बसमधुन फिर्यादी हे प्रवास करीत असताना त्यांचा जु.वा.अं. कि.रू. ९०,०००/- किंमतीचा टायटॅनियम ब्लॅक रंगाचा सॅमसंग गॅलेक्सी एस २५ अर्टा मोबाईल, हा फिर्यादी यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातुन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केला म्हणुन फिर्यादी यांच्या तक्रारीवरून अज्ञात इसमाविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

एमआयडीसी पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उ.नि नवले व पथकाने एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत बेस्ट प्रवाशी बसमध्ये वारंवार होणारे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता ४० ते ४५ सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराकडून प्राप्त केलेल्या माहितीवरून नमुदचा गुन्हा मुंब्रा व शिवाजी नगर याठिकाणी राहणारे अभिलेखावरील तसेच बेस्ट प्रवाशी बसमध्ये मोबाईल चोरी करणारे एकुण ०७ आरोपींना अटक करुन मोबाईल फोन चोरी करणारी टोळी उध्वस्त केली आहे. बेस्ट प्रवासी बसमधील मोबाईल चोरीचे एकुण ०३ गुन्हे उघकीस आणले आहेत. तसेच नमुद आरोपीकडून एकूण १२,६७,५००/- रूपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे एकूण १३५ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत. अशाप्रकारे मुंबई शहरात विविध भागात बस मधुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मोबाईल चोरी करणारी टोळी अटक करून उध्वस्त करण्यात एमआयडीसी पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकास यश प्राप्त झालेले आहे. सदर यशस्वी कामगिरी पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (का व सु) मनोजकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, डॉ. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ०३ दत्ता नलावडे, सहा. पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग योगेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक घनश्याम नायर, पो. निरीक्षक सुनिल करांडे (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि किरण नवले, पो.ह. नितीन नलावडे, प्रविण जाधव, स्वप्निल तेली, शितल माळी, व पो.शि. सुरज जगताप यांनी पार पाडली आहे.

# ज्युनियर आर्टिस्टच्या न्याय्य मागण्यांवर शासन सकारात्मक– कामगार मंत्री आकाश फुंडकर

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



**मुंबई :** राज्यातील ज्युनियर आर्टिस्ट,च्या वेतनवाढ, सेवा अटी तसेच कामगार हक्कांबाबत शासन संवेदनशील असून त्यांच्या सर्व न्याय्य मागण्यांवर नियमानुसार आणि कायदेशीर चौकटीत योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली.

ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशनच्या प्रतिनिधींनी मंत्री फुंडकर यांची भेट घेऊन कनिष्ठ कलाकारांच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी त्यांनी प्रतिनिधींच्या मागण्या सविस्तरपणे ऐकून घेत संबंधित विषयाची गांभीर्याने दखल घेतली. यावेळी मंत्री फुंडकर म्हणाले, मनोरंजन क्षेत्रातील कनिष्ठ कलाकार हे या उद्योगाचा महत्त्वाचा घटक असून त्यांच्या श्रमांचा योग्य सन्मान होणे आवश्यक आहे. कामगारांचे हित, सुरक्षितता आणि न्याय्य वेतन ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असून संबंधित सर्व बाबींची सखोल पडताळणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. कामगारांचे हक्क अबाधित राहतील, यासाठी शासन कटिबद्ध आहे. कामगार विभागाच्या माध्यमातून संबंधित यंत्रणा, ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशन आणि निर्माते संघटना यांच्यात समन्वय साधून सर्वमान्य व शाश्वत तोडगा काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. कामगारांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करून कायदेशीर तरतुदींनुसार निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील प्रत्येक कामगाराला सन्मानाने आणि सुरक्षित वातावरणात काम करण्याची संधी मिळावी, ही शासनाची भूमिका असून कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असेही मंत्री फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

# रस्त्यांवरचे खड्डे चालतील, पण बंगला चकाचक

राजेशा जायस्वाल ५ ऑगस्ट

## महापौर बंगल्यासाठी 3 कोटींचे नवे टेंडर



**मुंबई:** मुंबईच्या महापौरांनी मंजूर केलेला बंगल्यावरील खर्च पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. बायकुला येथील महापौरांच्या बंगल्यावरील खर्चाचा आकडा समोर आला असून, तो सातत्याने वाढत असल्याचे दिसून येत आहे. बंगल्याचे महापौर नवीन रहमानलू यांनी दुरुस्ती आणि विविध कामांसाठी सुमारे ७५ लाख रुपये खर्च केले असतील. त्यानंतर स्थायी समितीने सुमारे ३.५० कोटी रुपयांच्या नूतनीकरण प्रस्तावाला मंजुरी दिली आणि त्यानुसार काम पूर्ण झाले. नूतनीकरणानंतरच, बंगल्याच्या बाहेरील आवारातील सुविधा पुन्हा विकसित करण्यासाठी २.८९ कोटी रुपयांची नवीन निविदा मागवण्यात आली आहे. या कामांमध्ये ध्वनीरोधक पॅनेल, पावसाच्या पाण्याचे आणि पर्जन्यजल वाहिन्यांचे बांधकाम, इंटरलॉकिंग काँक्रीट पेव्हर्स आणि भूमिगत व उंच पाण्याच्या टाक्यांचा समावेश आहे.

मात्र, महापौरांच्या बंगल्यावर कोट्यवधी रुपये खर्च झाल्यानंतर, आता पुन्हा सुमारे तीन कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येत असून या खर्चावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या मुद्द्यामुळे राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची शक्यता आहे.

**आणखी २ कोटी ८९ लाख रुपयांची निविदा!**

दरम्यान, एप्रिल २०२६ मध्ये बंगल्याच्या नूतनीकरणाला मंजुरी मिळाल्यानंतर, मुंबई महानगरपालिकेने बाहेरील आवारातील विविध निवास सुविधांसाठी आणखी २ कोटी ८९ लाख रुपयांकरिता सुमारे ३ कोटी ४० लाख रुपयांची निविदा काढली आहे. किंवा सध्या सुरू असलेल्या कामांमध्ये पटनवाला रोडखालील वाहतुकीचा आवाज कमी करण्यासाठी ध्वनीरोधक उभारणे, नळपाणी आणि पावसाच्या पाण्याचे कालवे टाकणे, इतर भूमिगत सेवा कालव्यांवरील काम, त्यावर इंटरलॉकिंग काँक्रीट पेव्हर्स टाकणे आणि भूमिगत व उंच पाण्याच्या टाक्यांची उंची वाढवणे यांचा समावेश आहे.

# पनीरसारखे दिसणारे 'ॲनालॉग' हद्दपार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

मुंबई : सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी महाराष्ट्रात पनीरसारख्या दिसणाऱ्या 'पनीर ॲनालॉग'चे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्री यांवर एक वर्षासाठी बंदी घालण्याचा आदेश अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) दिला आहे. हा आदेश ३० जुलै रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला. एफडीएकडून १ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीत तपासलेल्या ३०८ पनीरच्या नमुन्यांपैकी १०९ नमुने (३५.४ टक्के) निकृष्ट किंवा असुरक्षित असल्याचे आढळून आले. त्यापैकी ७९ नमुने निकृष्ट, तर ३० नमुने असुरक्षित असल्याचे प्रयोगशाळा अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# एम.टी. एन. एल भूमीगत कॉपर केबल चोरी करणाऱ्या अंतरराज्यीय टोळीचे दोन गुन्हे उघडकीस

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**मुंबई :** ०२/०८/२०२६ रोजी बर्कले पॅलेस, रेल्वे कॉलनी लगत असलेल्या फूटपाथवर, मुंबई येथे काही इसम खोदकाम करून केबल चोरी करत असुन तात्काळ पोलीस पथकाने तेथे छापा टाकुन दोन इसमांना त्यांच्याकडील खोदकामाच्या साहित्य कुदळ, फावडा व कटर यांच्यासह पकडले होते. झालेल्या झटापटीत त्याचे दोन साथीदार हे टेम्पो व चोरलेले मालमत्तेसह पळुन गेल्याने, सर जे.जे. मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हयाच्या तपासा दरम्यान आरोपी मोहम्मद सरवर मो. अनवर अन्सारी, आसिफ दिलदार सय्यद आणि आझम फक्रुद्दीन कुरेशी या तीन आरोपींना अटक केली आहे. तसेच ०४/०८/२०२६ रोजी पहाटे गोपनीय माहिती मिळाल्यावरून पोलीस पथकाने बर्कली पॅलेस, रेल्वे कॉलनी समोरील फुटपाथ येथे छापा टाकला असता तेथे चार इसम हे कटरच्या सहाय्याने एम टी एन एल ची केबल कटींग करताना आढळले. त्याकरिता नमुद आरोपीतांनी जमीन खोदण्यासाठी जेसीबी वाहन आणले होते. तसेच चोरलेली केबल घेवुन जाण्यासाठी आयशर टेम्पोमध्ये भरत होते. सदरवेळी पोलीस पथकाने चारही इसमांना त्यांच्याकडील जेसीबी, आयशर टेम्पो, एक कार, कटर तसेच ७० मीटर कॉपर केबल आणि ०१ होंडा सीव्हीक मोटार कार वगैरे अंदाजे एकूण ५५ लाख रूपयांचे साहित्य ताब्यात घेवुन चारही इसमांविरूध्द गुन्हा दाखल केला. आरोपी सलमान अक्रम अली अन्सारी, सुफियान फकरुद्दीन कुरेशी, जुनेद जावेद अहमद आणि मोहम्मद बबलु मोहम्मद रजी शेख अशा एकूण चारही आरोपींना अटक करण्यात आली. दोन्ही गुन्हयांच्या तपासा दरम्यान आरोपी नियोजनबद्ध पद्धतीने जेसीबी व इतर वाहनांच्या सहाय्याने भूमिगत कॉपर केबल चोरी करीत असल्याचे तसेच अधिकृत काम सुरू असल्याचा खोटा आभास निर्माण करून गुन्हे करण्याची विशिष्ट कार्यपद्धती अवलंबत असल्याचे दिसत आहे. त्यांची आंतरराज्यीय टोळी असुन त्यांचे साथीदारांच्या मदतीने परराज्यात चोरलेली मालमत्ता विक्री करत असल्याचे निष्पन्न होत आहे. त्याबाबत सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून सखोल तपास सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135